# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर



## राज्यभरात विश्रांती घेतलेल्या पावसाची पुन्हा तीव्रता वाढण्याची शक्यता

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात सध्या सर्वच भागांत मुसळधार पावसाची स्थिती नसली तरी पुढील काही दिवसांत पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः १३ ऑगस्टपासून राज्यातील काही भागांमध्ये पावसाची तीव्रता वाढू शकते, अशी माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याचे चित्र आहे. मात्र, मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची चिन्हे दिसत असून १३ ऑगस्टपासून राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांना याचा अधिक फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढील काही दिवस हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. दरम्यान, मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने ८ ऑगस्टला जारी केलेल्या पुढील पाच दिवसांच्या अंदाजानुसार उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण-गोव्यात बहुतांश ठिकाणी पाऊस अपेक्षित आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात विखुरलेल्या ठिकाणी पावसाची शक्यता आहे. ९ ते १२ ऑगस्टदरम्यानही कोकणात पावसाची शक्यता कायम राहणार आहे.


(वर्ष ६५ वे अंक २०३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.११ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# पेपरफुटीविरोधात आंदोलन, रांचीत विद्यार्थी अन् पोलिसांमध्ये धुमश्चक्री

## बॅरिकेड्स तोडले; विद्यार्थ्यांविरोधात अश्रूधुराच्या नळकांड्या अन् लाठीचार्ज



रांची दि.१० (वृत्तसंस्था)- झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोग भरतीमध्ये झालेल्या कथित घोटाळ्याविरोधात आणि पेपरफुटीविरोधात सुरू असलेलं आंदोलन आता पेटल्याचं चित्र आहे. विद्यार्थ्यांच्या विधानसभा मार्चदरम्यान प्रचंड गदारोळ झाला असून पोलिसांनी विद्यार्थ्यांविरोधात लाठीचार्ज केला. यावेळी काही विद्यार्थ्यांच्या डोक्याला दुखापत झाली. विधानसभेला घेराव घालण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि पाण्याच्या फवाऱ्याचा वापर केला.

आंदोलनाचे नेतृत्व करणारे विद्यार्थी नेते देवेंद्र महतो म्हणाले, ''आज राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस आहे. परंतु, वाढदिवसाच्या दिवशी विद्यार्थ्यांना अश्रूधूर आणि वॉटर कॅनॉनची भेट देऊन झारखंड सरकार राज्याला कलंकित करत आहे. हा जनसमुदाय पाहून सरकार घाबरले असून हीच गर्दी सरकारची खुर्ची हलवून सोडेल. आता आम्ही कोणत्याही शिष्टमंडळाशी नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांशीच चर्चा करणार आहोत. जर सरकारला आपली खुर्ची वाचवायची असेल तर आमच्या सर्व मागण्या मान्य कराव्या लागतील.''

भरती प्रक्रियेतील अनियमितता प्रकरणी सीआयडीने मोठी कारवाई करत जेपीएससीचे माजी अध्यक्ष एल. ख्यांगते यांना अटक केली आहे. आंदोलनाचा दबाव आणि चौकशीमुळे ख्यांगते यांनी एका दिवसापूर्वी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. सीआयडीने यापूर्वी त्यांची चार वेळा कसून चौकशी केली होती आणि राजीनाम्यानंतर लागलीच दुसऱ्या दिवशी त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या.

रविवारी सरकार आणि विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये पार पडलेल्या तिसऱ्या फेरीच्या बैठकीत सरकारने १४ वी जेपीएससी (पान ४ वर)

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनात समाजकंटक शिरलेत; विद्यार्थी नेता रवींद्र पासवान यांची कारवाई करण्याची मागणी

झारखंडची राजधानी रांची येथे विद्यार्थी आंदोलकांच्या विधानसभा घेराव मार्चदरम्यान झालेल्या पोलिसांचा लाठीचार्ज आणि दगडफेक-चपलाफेक प्रकरणावर विद्यार्थी नेते रवींद्र पासवानने प्रतिक्रिया दिली आहे. ''विद्यार्थ्यांचे आंदोलन शांततापूर्ण आणि सनदशीर मार्गानेच सुरू आहे. मात्र, या आंदोलनाला वेगळे वळण देण्यच्या इराद्याने, काही समाजकंटक आंदोलनात शिरले आहेत. प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ शूटिंग तपासून अशा समाजकंटकांना शोधावे आणि कारवाई करावी, अशी मागणी रवींद्र पासवानने केला आहे.

रवींद्र पासवान यांने आंदोलनात घडलेल्या हिंसक प्रकाराचा निषेध केला आहे. तसेच, ''प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ शूटिंग तपासून, पोलिसांवर चपला आणि बाटल्या फेकून वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी. आमचे स्वयंसेवकही अशा समाजकंटकांना शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. कोणत्याही विद्यार्थ्याला जवळपास संशयास्पद व्यक्ती आढळल्यास, त्यांनी तात्काळ आमच्या स्वयंसेवकांशी संपर्क साधावा,'' असे आवाहन रवींद्र पासवानने केले आहे. ''हे आंदोलन आम्ही शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाने पूर्ण करू. मी राज्य सरकारला नम्रपणे आवाहन करतो की, हे एक ऐतिहासिक आंदोलन ठरणार आहे. सरकारने हे गांभीर्याने घ्यावे आणि आजच्या आज निर्णय घ्यावा.''

# आम्हाला काल्पनिक चर्चांमध्ये रस नाही, नरेंद्र मोदींनी माफी मागावी

## राहुल गांधी यांची संसदेत आक्रमक मागणी

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज आणि राम मंदिरातील दान गैरव्यवहाराच्या मुद्द्यांवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. ''आमच्या तीन प्रमुख मागण्यांवर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही,'' असा स्पष्ट इशारा देत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे थेट उत्तर मागितले आहे.

नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या कारभारावर जोरदार टीका केली. संसदेत या विषयांवर तात्काळ चर्चा झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

दिल्लीमध्ये २० जून रोजी झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्ज कारवाईवरून संसदेत राजकीय वादळ उठले आहे. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या मुद्द्यांवर संसदेत व्यापक चर्चेची आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उत्तराची तयारी दर्शवली असली, तरी काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही ऑफर फेटाळून लावली आहे.

''आम्हाला कोणत्याही काल्पनिक चर्चांमध्ये रस नाही,'' असा टोला लगावत, ''गृहमंत्री अमित शाह यांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिस कारवाईचे किंवा गोळीबाराचे आदेश दिले होते की नाही, याचे थेट उत्तर द्यावे,'' अशी आक्रमक मागणी राहुल गांधी यांनी केली आहे.

माध्यमांशी बोलताना राहुल गांधी यांनी स्पष्ट केले की, विरोधी पक्षाची मागणी अमित शाह यांनी संसदेत येऊन केवळ सामान्य विषयांवर भाषण करण्याची नाही. २० जून रोजी दिल्लीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचे आदेश नेमके कोणी दिले, हा आमचा मुख्य प्रश्न आहे.

राहुल गांधी यांच्या ३ प्रमुख मागण्या आहे. विद्यार्थ्यांवर झालेला लाठीचार्ज आणि 'पेलेट गन'चा झालेला वापर ही अत्यंत गंभीर बाब आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतः संसदेत येऊन या कारवाईवर चर्चा करावी. तसेच, विद्यार्थ्यांवर बळप्रयोग करण्याचे आणि पेलेट गन वापरण्याचे आदेश नेमके कोणी दिले, हे गृहमंत्र्यांनी संपूर्ण देशाला स्पष्ट करावे., दिल्लीत ज्या प्रकारे विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली, तो प्रकार संतापजनक आहे. देशातील विद्यार्थ्यांवर झालेल्या या अन्यायाची जबाबदारी स्वीकारून खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितली पाहिजे. राम मंदिराच्या दान व निधीमध्ये झालेल्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवर संसदेत सर्वांसमोर उघडपणे आणि पारदर्शक चर्चा झाली पाहिजे. अशा या मागण्या आहेत.

## युक्रेनचा रशियावर मोठा हल्ला; १२ जणांचा मृत्यू, ३९ जखमी

मॉस्को दि.१० (वृत्तसंस्था)- रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या ४ वर्षांपासून जोरदार युद्ध सुरू आहे. आता युक्रेनने रशियाच्या सीमेपासून तब्बल १२०० किलोमीटर आत शिरून निजनेकाम्स्क या शहरावर आतापर्यंतचा सर्वात घातक ड्रोन हल्ला चढवला आहे. तातारस्तान भागात करण्यात आलेल्या या भीषण हल्ल्यात १२ जणांचा मृत्यू झाला तर ३९ जण गंभीर जखमी झाले आहेत.

निजनेकाम्स्क हे शहर रशियातील एक अत्यंत महत्त्वाचे तेल शुद्धीकरण आणि पेट्रोकेमिकल केंद्र म्हणून ओळखले जाते. युक्रेनने याच शहरावर हल्ला करून रशियाला दुहेरी घाव दिला आहे. पहिले म्हणजे, या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. तसेच दुसरे म्हणजे, या हल्ल्यात रशियाचा एक मुख्य ऊर्जा प्रकल्पही नष्ट झाला आहे. गेल्या काही महिन्यांत युक्रेनने लांब पल्ल्याच्या ड्रोनचा वापर करून अनेकवेळा रशियन तेल प्रकल्पांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे रशियामध्ये इंधनाचा तुटवडा निर्माण झाला असून तेल शुद्धीकरण क्षमतेवरही मोठा परिणाम झाला आहे. परिणामी जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भीषण हल्ल्यानंतर, युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदिमिर झेलेंस्की म्हणाले, ''रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना वाटाघाटीच्या टेबलावर आणणे आणि गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले युद्ध थांबवण्यास भाग पाडणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. ''

दरम्यान, रशियन संरक्षण मंत्रालयाने रात्रभरात युक्रेनचे ४५६ ड्रोन्स पाडल्याचा दावा केला आहे. मात्र, युक्रेनच्या या धाडसी हल्ल्याने रशियाच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आठ खासदार पंतप्रधान मोदींना भेटले

## राजकीय वर्तुळात खळबळ; शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी भेट झाल्याचे खा.सोनवणेंची माहिती

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदारांनी भेट घेतली. या खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व खासदार सुप्रिया सुळे यांनी केलं. जवळपास अर्धा तास ही बैठक झाली. या बैठकीत खासदारांनी आपापल्या मतदारसंघातील मुद्दे मांडले. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मोदींच्या भेटीनंतर कोणकोणत्या मागण्या याची माहिती दिली.

खासदार बजरंग सोनवणे यांनी मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले. पावसाळ्याचे अडीच महिने उलटूनही पाऊस न पडल्याने नद्या कोरड्या ठाकल्या आहेत. गोदावरीचा अपवाद वगळता एकाही नदीला पाणी आलेले नाही. पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. या संकटसमयी मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी सरकारने तातडीने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी सोनवणे यांनी केली. तसेच सन २०२५-२६ चा पीक विमा आणि अतिवृष्टीचे अनुदान अजूनही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊनही मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून लोक रस्त्यावर उतरत आहेत. त्यामुळे थकीत पीक विमा आणि नुकसानभरपाई त्वरित देण्याची मागणी त्यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष महायुती किंवा एनडीएमध्ये जाणार असल्याच्या चर्चांवर खासदार सोनवणे यांनी स्पष्ट शब्दांत पडदा टाकला. ''आम्ही १०० टक्के नव्हे तर १०० टक्के विरोधी पक्षातच राहणार आहोत,'' असा दावा त्यांनी केला. विमानात सत्ताधारी नेत्यांशी होणाऱ्या भेटीगाठींवरून विनाकारण संशय व्यक्त केला जात असल्याचे सांगत ते म्हणाले, ''प्रवासादरम्यान योगायोगाने भेटी होणे स्वाभाविक आहे. यापूर्वीही विरोधी पक्षाचे नेते लोकहितार्थ सत्ताधाऱ्यांना भेटत होते. परंतु, अशा भेटींचा राजकीय अर्थ काढणे योग्य नाही.'' पक्षाची भूमिका ठाम असून आपण विरोधी पक्षाच्या बाकावरच बसून जनतेचे प्रश्न मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संसदेचे कामकाज सुरळीत चालवणे ही सत्ताधारी पक्षाची प्राथमिक जबाबदारी असते, असे मत खासदार सोनवणे यांनी मांडले. सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षातील सर्व प्रमुख नेत्यांची बैठक बोलावून चर्चा करणे आवश्यक असते. परंतु, सरकार विरोधकांशी संवादच साधत नसेल तर मार्ग कसा निघणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सत्ताधाऱ्यांच्या या आडमुठ्या भूमिकेमुळेच सभागृह चालत नसून याला पूर्णपणे सरकारच जबाबदार आहे. विरोधी पक्ष आणि इंडिया आघाडी जो काही निर्णय घेईल, त्याच्यासोबत आपला पक्ष पूर्ण ताकदीने उभा राहील, असेही त्यांनी नमूद केले.

## बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या सूचना दिल्याच नाहीत; उपजिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

बीड दि.१० (प्रतिनिधी)- रेखा अंबुरे यांच्या कुणबी जात प्रमाणपत्रावरून सुरू असलेल्या वादाला आता बीड जिल्हा प्रशासनाने अधिकृत स्पष्टीकरण देत पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रातून मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांमध्ये केलेल्या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, रेखा अंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याचा दावा आणि महसूल मंत्र्यांच्या सूचनेनुसार प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, बीड प्रशासनाच्या अहवालानुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोणतेही कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या सूचना दिलेल्या नाहीत. मंत्र्यांकडून केवळ चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र प्राप्त झाले होते, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

रेखा अंबुरे या माजलगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत मागास प्रवर्ग महिला गटातून निवडून आल्या होत्या. त्यांच्या कुणबी प्रमाणपत्राशी संबंधित कागदपत्रे आणि नोंदीवरून वाद निर्माण झाला होता. या प्रकरणात अंबुरे यांनी मौजे खळवट लिमगावचा नमुना-३३ संकेतस्थळावर अपलोड करण्याची विनंती प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर त्यांच्या विनंतीनुसार संबंधित कागदपत्रांची चौकशी करण्यात आली.

रेखा अंबुरे यांच्या विनंतीनंतर (पान ४ वर)

# शिवसेनेच्या ६ खासदारांच्या विलीनीकरणावर सुनावणी

## पक्षांतरबंदी कायद्याचे थेट उल्लंघन असल्याचा ठाकरे गटाचा दावा

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांचे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत झालेले विलीनीकरण बेकायदेशीर असल्याचा दावा करत ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. लोकसभा अध्यक्षांनी या विलीनीकरणाला दिलेल्या मंजुरीला आव्हान देत, ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी ही याचिका दाखल केली आहे. या महत्त्वपूर्ण याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली.

या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाच्या वतीने लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाला तातडीने स्थगिती देण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने यावर कोणताही अंतरिम दिलासा देण्यास सध्या नकार दिला आहे. तसेच, या प्रकरणाची दखल घेत न्यायालयाने सर्व संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर झालेल्या या सुनावणीत शिवसेना ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी भक्कम युक्तिवाद केला. पक्षाच्या संमतीविना आणि मूळ पक्षात विलीनीकरण न होता, केवळ ६ खासदारांनी एकतर्फी निर्णय घेत शिंदे गटात जाणे हे राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीचे (पक्षांतरबंदी कायदा) थेट उल्लंघन असल्याचे ॲड. कामत यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, लोकसभा सचिवालयाच्या संबंधित परिपत्रकामुळे ठाकरे गटाचे लोकसभेतील संख्याबळ ९ वरून ३ वर आल्याची बाब अधोरेखित करत, या निर्णयाला (पान ४ वर)

## आमची सत्ता येऊ द्या, पक्ष कसे फुटतात ते दाखवून देऊ; संजय राऊतांचा भाजपला इशारा

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर सडकून टीका केली. शरद पवार गटाच्या खासदारांची पंतप्रधान मोदींसोबतची नियोजित भेट, राज्यात झालेले पक्षांतर आणि जयंत पाटील यांच्या विमान प्रवासाच्या मुद्द्यांवर राऊत यांनी अत्यंत आक्रमक आणि खोचक शब्दांत उत्तरे दिली. सत्ता गेल्यावर भाजपची अवस्था माचीसच्या रिकाम्या बॉक्ससारखी होईल, असा घणाघात त्यांनी यावेळी केला.

शरद पवार गटाचे खासदार आज पंतप्रधान मोदींची भेट घेणार, यावर बोलताना राऊत म्हणाले, ''देशाचे गृहमंत्री मुंबईपासून काश्मीरपर्यंत फिरतात, पण संसदेत बसत नाहीत. पंतप्रधान मोदीही संसदेत येत नाहीत. मग खासदारांना आपले प्रश्न घेऊन त्यांना भेटायला जावे लागते, यात आश्चर्य काय? हे खासदार लपूनछपून भेटत नसून रीतसर वेळ काढून भेटत आहेत.''

या भेटीमुळे विरोधी पक्षाच्या प्रतिमेला तडा जातोय का? यावर स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, ''माझे सुप्रिया सुळेंशी बोलणे (पान ४ वर)

## तमिळ आमची जीवनवाहिनी; केंद्राच्या 'वंदे मातरम' भूमिकेला मुख्यमंत्री विजय यांचे आव्हान

चेन्नई दि.१० (वृत्तसंस्था)- तमिळनाडू विधानसभेत एकमताने एक ठराव मंजूर करण्यात आला असून, त्यानुसार शासकीय कार्यक्रमांच्या सुरुवातीला सर्वप्रथम तमिळ थाई वाझ्थु हे राज्यगीत गाणं बंधनकारक करण्यात आलं आहे. या निर्णयाकडे, कार्यक्रमांच्या सुरुवातीला 'वंदे मातरम' हे राष्ट्रीय गीत सर्वप्रथम वाजवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्देशाना मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी दिलेले आव्हान म्हणून पाहिलं जात आहे.

हा ठराव मांडताना मुख्यमंत्री विजय म्हणाले की, राज्यामध्ये तमिळ गीतालाच सर्वोच्च प्राधान्य मिळालं पाहिजे. द्रमुक आणि अद्रमुक या दोन्ही पक्षांनी या ठरावाला पाठिंबा दिला. विधानसभा अध्यक्ष जे.सी.डी. प्रभाकर यांनी हा ठराव मंजूर झाल्याची घोषणा केली आणि याच्या अंमलबजावणीसाठी आता इतर कोणत्याही परवानगीची आवश्यकता नसल्याचं सांगितलं. आज विधानसभेतील एका भावनिक भाषणात विजय यांनी स्पष्ट केलं की, त्यांचं सरकार राज्याच्या भाषिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या बाबतीत कोणतीही तडजोड करणार नाही. ''तमिळ ही केवळ एक भाषा नसून ती आमची जीवनवाहिनी आणि भावना आहे'', असं सांगत त्यांनी मातृभाषा ही मातृत्वाइतकीच पवित्र असल्याचं अधोरेखित केलं.

ते पुढे म्हणाले, ''तमिळ म्हणजे अभिमान, तमिळ म्हणजे ताकद. तुम्ही तमिळ शब्द उच्चारताच संपूर्ण तमिळनाडू एकत्र येतो आणि एकसंध उभा राहतो. तमिळनाडूमध्ये 'तमिळ थाई वाझ्थु'लाच पहिले स्थान मिळालं पाहिजे. 'तमिळ थाई वाझ्थु'ला पहिलं स्थान देणं हा आमचा अधिकार आहे.'' या ठरावानुसार तमिळनाडूतील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक (पान ४ वर)

## मराठा आरक्षणासाठी जिंतूर तालुक्यात युवकाने घेतला गळफास

परभणी दि.१० (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावरून नैराश्यात असलेल्या ३० वर्षीय युवकाने चिठ्ठी लिहून घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी (दि. ९) सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. 'आरक्षण मिळत नसल्याने मी फाशी घेत आहे सरकारने लवकर आरक्षणाचा प्रश्न सोडावा' असा मजकूर असलेली चिठ्ठी या तरुणाच्या खिशात आढळली आहे.

गणेश आश्रोबा ठोंबरे असे गळफास घेतलेल्या युवकाचे नाव आहे. या प्रकरणी बामणी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गणेश ठोंबरे यांनी रविवारी सायंकाळी आपल्या राहत्या घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर नातेवाइकांनी त्यांना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी मुंडे यांनी (पान ४ वर)

## एकनाथ शिंदेंची मराठ्यांमधील क्रेझ कमी करण्याचा डाव-मनोज जरांगे

सांगली दि.१० (प्रतिनिधी)- कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर टीकेची झोड उठवणाऱ्या मनोज जरांगे यांनी एक मोठी शंका व्यक्त केली आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ज्या कुणबी नोंदी सापडल्या आहे, त्या आता रद्द केल्या जात आहेत. त्यातून एकनाथ शिंदे यांची मराठ्यांमध्ये निर्माण झालेली क्रेझ कमी करण्याचा डाव असू शकतो, अशी शंका जरांगे यांन व्यक्त केली आहे. मनोज जरांगे हे राज्यव्यापी दौऱ्यावर असून सांगलीत त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मनोज जरांगेंच्या आंदोलनानंतर महाराष्ट्रात जुन्या वंशावळी शोधून कुणबी प्रमाणपत्रं देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. पण गेल्या काही दिवसात काही मराठा उमेदवारांची प्रमाणपत्र अवैध ठरल्याचं समोर आल्यावर मनोज जरांगेंचा चांगलाच पारा चढला. त्यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर जहरी टीका करत ढबल ढोलकी असल्याचा आरोप केला. शिंदे यांच्या मान्यतेनंतर त्यांचे मंत्री संजय शिरसाट यांच्या आदेशाने कुणबी प्रमाणपत्र रद्द केली जात असल्याचा आरोप जरांगे यांनी केला होता. त्यानंतर आता जरांगे यांनी आपल्या टीकेचा सूर बदलत नवी शंका व्यक्त केली.

मनोज जरागे म्हणाले की, ''मराठा समाजाला पक्क टिकणारं आरक्षण हवं आहे. त्यासाठी ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र दिली पाहिजेत. आतापर्यंत ५८ लाख नोंदी सापडल्या. एकनाथ शिंदे यांच्या काळात या ५८ लाख नोंदी सापडल्या. परंतु आता देवेंद्र फडणवीस यांच्या काळात बावनकुळेंना काही वेगळं वाटत असेल. या नोंदी रद्द केल्या तर मराठ्यांमध्ये एकनाथ शिंदे यांची क्रेझ निर्माण झाली आहे ती मिटेल, असा प्लॅन असण्याचा डाव असू शकतो.'' एकनाथ शिंदे यांच्या काळात ज्या नोंदी सापडल्या त्या अशाच सापडल्या नाहीत. त्यासाठी आम्हाला आंदोलन करावं लागलं. एकनाथ शिंदे यांनी शिंदे समिती गठीत केली आणि त्या माध्यमातून या नोंदी शोधल्या. आता त्या नोंदी रद्द करण्याचं काम बावनकुळेसारखी माणसं करत आहेत, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. मराठ्यांना दिलेलं पक्क आरक्षण हे टिकू देत नाहीत. १००-२०० वर्षांपूर्वीच्या नोंदी मिळाल्या तरी ते प्रमाणपत्र रद्द केली जात आहेत. मग हे १० टक्के आरक्षण तरी ठेवतील का अशी शंका आहे, असंही जरांगे म्हणाले.

## चार प्रमाणपत्र रद्द झाले तर जरांगे थयथय नाचतोय, महाराष्ट्रात सामाजिक अन्याय सुरु-लक्ष्मण हाके

सोलापूर दि.१० (प्रतिनिधी)- राज्य सरकारने कुणबी समाजाला लागू केलेल्या ओबीसी आरक्षणाच्या दाखल्यावरुन पुन्हा राजकीय वातावरण तापलं आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषणाची हाक देत पश्चिम महाराष्ट्र दौरा सुरू केलाय. त्यात, सोलापूर दौऱ्यातून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंवर हल्लाबोल केला. आता, जरांगे पाटील यांच्यावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याकडून पलटवार केला जात आहे. लक्ष्मण हाकेंनी सोलापुरातील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करत पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आमदार प्रसाद लाड यांच्यावर जोरदार टीका केली.

राज्यातील ओबीसी आरक्षण संपलेले आहे, आरक्षण संपलं की नाही हे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलं पाहिजे. राज्यभरात मनोज जरांगे (पान ४ वर)


# आत्महत्या रोखण्यासाठी जागरूकता गरजेची

देशात आत्महत्येचं प्रमाण दिवसागणिक वाढताना दिसत आहे. देशातच नाही तर जगभरात प्रत्येक वर्षाला जवळपास ८,५०,००० लोक आत्महत्या करतात, तर १५ मिलियन लोक आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, १५ ते १९ वर्षे या वयोगटातील आत्महत्या हे मृत्यूचं प्रमुख कारण आहे. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात. आत्महत्या अर्थात स्वतःचा जीव घेणे ही वृत्ती. तणाव, दु:ख, निराशा, अपयश, एकाकीपणा, अपमान आणि गरिबी, वृद्धत्व, गंभीर आजार आत्महत्येची प्रमुख कारणं म्हणता येतील. समस्या सोडवण्याचा कोणताही मार्ग नाही असे वाटणारे ल ोक आत्महत्या करतात. कार आत्महत्या हा वेदना संपवण्याचा एकमेव मार्ग आहे; परंतु तुम्ही सुरक्षित राहण्यासाठी पावले उचलू शकता आणि पुन्हा तुमचे जीवन आनंदाने जगू शकता.

आत्महत्या हा मानसिक आजार आहे. दैनंदिन जीवनात आत्महत्या ही एक गंभीर समस्या आहे. एका रिसर्चमध्ये केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ ते ३५ वर्षे वयोगटातील पुरुष आणि स्त्रिया जास्त आत्महत्या करतात. छोटी छोटी संकटे आली तरी हल्ली लोकांच्या मनात आत्महत्येचे विचार मनात घोंगावू लागतात. समस्या, दु:ख प्रत्येकाच्या वाट्याला असतात. त्यावर मात करायची तयारी ठेवली पाहिजे. आत्महत्या करून संकटे संपत नसतात. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे वाढत्या आत्महत्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता वाढत्या आत्महत्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे. कोणाचेही मन ओळखणे तशी अवघड गोष्ट असते. मनात काय विचार सुरू आहेत हे ओळखणे तसे कठीणच आहे. आपल्याकडे लोक काय म्हणतील, आपल्यातील दोष किंवा आपल्यातला कमकुवतपणा दुसऱ्यासमोर दाखवायचा नाही अशी संस्कृती आहे. मानसिक आजारांबद्दल अजूनही संकोच, लाज किंवा नकारात्मकता प्रत्येकामध्ये असते. कामाचा ताण, स्पर्धा, अपेक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणाला काही सांगायचे नाही हाच मोठा धोका आहे. त्यामुळे दरवर्षी लाखो लोक मानसिक ताण, सामाजिक दबाव किंवा एकटेपणामुळे टोकाचे पाऊल उचलत आपल ा जीव गमावतात. बहुतेक लोकांना जगायचे असते, पण त्यांची परिस्थिती किती भयानक आहे आणि त्यांना पर्यायी उपाय दिसत नसल्याने ते अडकलेले वाटतात. काही लोकांसाठी, तर्क करण्याची आणि समस्या सोडवण्याची सकारात्मक उपाययोजना करण्याची त्यांची क्षमता प्रभावित होते, परिणामी आवेगपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. दहावी, बारावी परीक्षेचीत अपयश आले तरी मुलांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागतात. ही चांगली गोष्ट नाही. दहावी, बारावी म्हणजे पूर्ण आयुष्य नसते. पुढे भरपूर आयुष्य असतं. हे समजावून सांगण्याची गरज असते. आज आपल्या राज्यात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. विशेषतः ते तरुणांमध्ये जास्त आहे. नैराश्य, चिंता, एकटेपणा हे दिसत नसले तरी ते आजारच आहेत. वारंवार उदास राहणे, सातत्याने निराशावादी बोलत राहणे, स्वतःला इजा करण्याबद्दल बोलणे, सामाजिक माघार घेणे, एकटे राहण्याची इच्छा व्यक्त करत राहणे. मानसिक आरोग्याच्या समस्या, नोकरी गमावणे, कर्ज, कौटुंबिक तणाव, आधाराचा अभाव, सामाजिक संपर्काचा अभाव असतो. यामुळे आत्महत्यांचे विचार मनात येत असतात. एकमेकांशी बोल ण्यापेक्षा किंवा गोष्टी शेअर करण्यापेक्षा आयुष्य संपवण्याचे धाडसी पाऊल उचलले जाते. ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे. मुळात कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते हे लक्षात घेतले पाहिजे. कारण अंधारानंतर प्रकाश हा असतोच. त्यामुळे एक नवी पहाट येतेच. त्यामुळे कुठल्याही समस्येवर आत्महत्या हा तोडगा नाही. कोणतीही समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करत राहणे गरजेचे असते. त्या प्रयत्नांना यश मिळेलच असा सकारात्मक विचार करणे गरजेचे असते. या सकारात्मतेमुळेच वेगळी ऊर्जा मिळते. त्यानंतर एक वेगळाच उत्साह येत असतो. आजच्या डिजिटल युगात संवाद कमी झाला आहे. पण, 'संवाद' हा आत्महत्या रोखण्यासाठीचे उत्तम औषध आहे. आपल्या अडचणी, समस्या एकमेकांना सांगितल्या तर त्या सोडवण्यासाठी मदत होते. त्यामुळे जवळचे मित्र, जवळची व्यक्ती यांच्याशी संवाद ठेवणे महत्त्वाचे असते. यामुळे मनावरील ताणही हलका होतो. तसेच ताण असेल तर समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ यांचा सल्लाही घेणे महत्त्वाचे ठरते. तुम्ही एकटे नाही, कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते. त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत करणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांची सामाजिक, शैक्षणिक प्रगती सुधारण्यास मदत होते, असे आशेचे संदेश देणेही त्यांच्यामध्ये बळ निर्माण करू शकतात. त्यामुळे असे आशेचे संदेश देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या काळात शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून ते तरुण आणि ज्येष्ठांपर्यंत तणावाचे प्रमाण अधिक आहे. हा तणाव दूर करण्यासाठी योग्य पद्धतीने समुपदेशन होणे गरजेचे आहे. तणावाविरुद्ध लढाई जिंकणे महत्त्वाचे आहे. आत्महत्येचे विचार टाळण्यासाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. कोणाला मदतीची गरज असेल तर त्यासाठी तत्परता दाखविली तर आपल्यासोबत कोणीतरी आहे, अशी आत्मीयता त्यांच्यामध्ये निर्माण होते. त्याच्यातून त्यांना ताण कमी होण्यास मदत होते. शारीरिक आरोग्याइतकीच मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही आता काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आत्महत्येसारख्या गंभीर विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. समस्येबद्दल, जागरूकता वाढवण्याबद्दल नाही तर ती आत्महत्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याबद्दल आहे. राष्ट्रीय आत्महत्यांचा डेटा नोंदवल्या गेलेल्या शेवटच्या काळात ३,००० हून अधिक लोकांनी आत्महत्या केल्या हे जाणून घेणे एक गोष्ट आहे. चिंता आणि ताणतणावांना दाबून ठेवणे (कारण कोणीतरी असे मानते की जर ते याबद्दल बोलले तर त्यांना दोषी ठरवले जाईल किंवा कमकुवत पाहिले जाईल) आत्महत्येच्या दरात वाढ होण्यास हातभार लावते हे जाणून घेणे दुसरी गोष्ट आहे. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

# जेन झी आणि सरसंघचालक

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुंबईत इंडियाज इंटरन'शनल मुव्हमेंट टू युनायटेड नेशन्स या कार्यक्रमात जेन झी व जेन अल्फा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नव्या पिढीतील युवकांना संबोधित केले. नीता मुकेश आंबानी इंटरनॅशनल कल्चरल सेंटरमध्ये हा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही देशातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था आहे. देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री तसेच केंद्र सरकारमधील भाजपाचे बहुतेक मंत्री व देशातील विविध राज्यातील मुख्यमंत्री व असंख्य मंत्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून घडले आहेत. संघाचे स्वयंसेवकच देशाचा व देशातील बावीस राज्यांचा कारभार चालवत आहेत. सरकारमधे सर्वोच्च पदावर संघ स्वयंसेवक असताना व भाजपा सत्तेवर असताना जेन झी च्या आंदोलकांवर पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला, खिळे ठोकलेल्या लाठ्यांनी विद्यार्थ्यांवर प्रहार केला, पोलिसांनी केलेल्या लाठीमारात शेकडो जणांची तोंडे रक्तबंबाळ झाली, हात- पाय फ्रक्चर झाले, मुलांवर अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या, दिल्लीत पलेट गन्समधून तर पाटण्यात एके ४७ मधून पोलिसांनी व जेन झीवर गोळीबार केला. मुलींना पोलसांनी वाईट वागणूक दिली. त्यांचे कपडे फाडले, त्यांच्या मागून काठ्या घुसविण्याचे प्रकार घडले. विद्यार्थी आंदोलकांवर पाण्याचे फवारे मारले. दिल्ली, पाटणा व मुंबईत आंदोलन करणाऱ्या जेन झी मुलामुलींवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. रात्री- अपरात्री घराचे दरवाजे ठोठावून मुलांना खेचून पोलीस ठाण्यावर नेले. दिल्ली. पाटणा किंवा मुंबई तिन्ही ठिकाणी भाजपाची सत्ता आहे. दिल्लीचे पोलीस केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. महाराष्ट्र, बिहारमधे मुख्यमंत्री भाजपाचे आहेत. पोलिसांनी जेन झी वर बळाचा वापर करून त्यांना झोडून काढले, त्यांचे भविष्य पोलीस डायरीत बंद करण्याचा प्रयत्न केला, याला कोण जबाबदार आहे ? तेव्हा जेन झी अँटीनॅशनल नाही असे कोणीही म्हणाले नाही ? जेन झीचे आंदोलन चालू असतानाच सरसंघचालकांनी सत्तेवर बसलेल्या आपल्या स्वयंसेवकांना नीट समजावून सांगितले असते तर मुलांवर बंदुका रोखल्या गेल्या नसत्या. तेव्हाच सरसंघचालकांनी सत्ताधारी स्वयंसेवकांना पोलिसांना बळाचा वापर करायला सांगू नका असे म्हटले असते तर पोलिसांनी काठ्या उचलल्या नसत्या. जेन झीवर पोलिसांनी केलेली कारवाई योग्य होती का, या प्रश्नावर सरसंघचालकांनी मौन पाळले. जंतरमंतरवर नेमके काय घडले हे त्यांना ठाऊक नसावे. पोलिसांच्या कारवाईत शेकडो मुलांना जखमा झाल्या. मुंबई, दिल्ली, पाटण्यातील शेकडो मुलांवर गुन्हे दाखल झाले. जेन झी आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या असे सर्वोच्च न्यायालयाला आदेश द्यावे लागले. त्यानंतर सरकारचे डोळे उघडले, नोंदवलेले एफआयआर काही एका रात्रीत रद्द करता येत नाहीत, त्यासाठी प्रक्रिया आहे. तोपर्यंत जेन झी आंदोलकांवर पोलीस कारवाईची टांगती तलवार कायम आहे. जेन झी च्या प्रखर आंदोलनाने केंद्रातील शिक्षणमंत्र्यांना राजीनामा देणे भाग पडले. आंदोलकांनी जिद्द, चिकाटी व हिम्मत दाखवली म्हणून सरकारला जेन झी पुढे झुकावे लागले. जगाने भारतातील जेन झी आंदोलनाची दखल घेतली. त्यानंतर सरसंघचालकांनी मुंबईत जेन झी व जेन अल्फाशी संवाद साधताना आंदोलकांच्या जखमांवर फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. उशीरा का होईना सरसंघचालकांनी जेन झी अँटीनशनल ( राष्ट्रविरोधी ) नाही हे ठामपणे सांगितले ही सुध्दा सरकारला मोठी चपराक आहे.



कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांनी जेन झी बद्दल मांडलेल्या भूमिकेवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अभिजीत म्हणतात, सर्वात महत्वाचे म्हणजे सरसंघचालक मोहन भागवत यांनी जेन झी अँटी न'शनल नाही, असे स्पष्ट सांगितले आहे. मोहन भागवत हे भाजपाचे मार्गदर्शक आहेत. नरेंद्र मोदींचे गॉड फादर आहेत. त्यांनी त्यांना स्पष्ट सांगावे की , जे युवक आहेत, जे विद्यार्थी आहेत, त्यांना अँटीनॅशनल समजू नये. अभिजीत म्हणतात- भाजपाशी संबंधित असलेले लोकच जेन झी ला अँटीनॅशनल म्हणत होते. माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तर जेन झीला दहशतवाद्यांची बी टीम असे संबोधले होते. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी जेन झी ला वायरस म्हटले होते. यापुढे तरी भाजपाला सरसंघचालकांची भूमिका ऐकावी लागेल. सत्तेवर बसलेले भाजपाचे लोक सरसंघचालकांचे म्हणणे ऐकणार नसतील तर संघाला गंभीरपणे विचार करावा लागेलः

भाजपाच्या मुख्यमंत्र्यांनी जे झी ला अराजक निर्माण करायचे आहे, असा आरोप केला होता. जेन झी ला भारताचा नेपाळ करायचा आहे, असेही आरोप केले गेले. जेन झी ला पाकिस्तान, अमेरिका आणि चीनमधून मदत मिळते आहे, असेही काहींनी तारे तोडले.

जेन झी ला बदनाम करण्याचा व जेन झी मधे फूट पाडण्याचा भरपूर प्रयत्न केला गेला. तेव्हा सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या मातृसंस्थेतील कोणीही जेन झी ला समजावून घेण्यासाठी पुढे आले नव्हते.

मोहन भागवत यांनी मुंबईत जेन झी शी संवाद साधताना म्हटले आहे की, जनरेशन झेड मधील आंदोलक हे देशविरोधी नाहीत, तसेच लोकशाहीमधे आंदोलन हे एकमत घडवून आणण्याचे साधन असते. विविध मतं समोर येतात व चर्चेनंतर एकमत साधलं जातं. चर्चा संवादानेच होऊ शकते. एखाद्याची मते ऐकूनच घेतली गेली नाहीत, तर आंदोलन सुरू होऊ शकते, मात्र समाजात फूट पाडणे हा उद्देश नसून एकमत घडवून आणणं हा उद्देश असला पाहिजे.

मोहन भागवत म्हणतात- जेन झी चा विचार करता, अलिकडच्या घटनांबाबत त्यांच्या तक्रारी रास्त आहेत. भारताच्या शिक्षण व्यवस्थेत खूप काही करणे आवश्यक आहे. ते केलं जात नाही म्हणून हे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यासाठीच संवाद आवश्यक आहे. जेन झी हे आपलेच आहेत. पुढच्या पिढीला आपलेपणाची भावना वाटेल असे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे.

जेन झी व जेन अल्फा यांची मानसिकता आधीच्या पिढीपेक्षा वेगळी आहे.आम्ही त्यांच्या वयाचे होतो, तेव्हा मोठ्यांचे म्हणणं आम्ही ऐकायचो. आताची पिढी प्रश्न विचारते व तार्किक उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते. जेन झी केवळ निषेध व्यक्त करण्यासाठी आंदोलन करीत नाही तर विशिष्ठ मुद्द्यांवर ते आपली मते मांडत आहे. त्या मुद्यांची दखल घेणे आवश्यक आहे.

येत्या पंधरा ऑगस्टला स्वातंत्र्यदिनानिमित्त देशाला संबोधित करताना तरूण पिढीला डोळ्यासमोर राहून संबोधित करावे, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी केंद्र सरकार कोणती पावले उचलत आहे, याची स्पष्ट माहिती द्यावी असे आवाहन अभिजीत दीपके यांनी पंतप्रधानांना केले आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील निवासस्थानी अभिजीत यांना कोण भेटायला येते यावर पोलिसांची बारीक नजर आहे. संजय शिरसाट यांच्या भेटीनंतर शिवसेना कॉक्रोच जनता पार्टीशी जवळीक साधते, म्हणून भाजपा नाराज असल्याच्या बातम्यांना उधाण आले. त्यावर बोलताना अभिजीत म्हणाले- एका तीस वर्षांच्या मुलापासून तुम्हाला एवढी भिती का वाटते ? संजय शिरसाट हे मला वैयक्तिक पातळीवर भेटायला आले होते. मी भाजपाला एवढेच सांगू इच्छितो , तुम्हाला घाबरण्याची गरज नाही. पोलीस, इडी, सीबीआय सर्व काही तुमच्याकडे आहे. आम च्याकडे काहीच नाही. लोक वैयक्तिकरित्या भेटायला येतात व चांगल्या कामासाठी शुभेच्छा देतात.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# वर्षावास : बुद्धांच्या धम्मापासून संविधानाच्या मूल्यांपर्यंतचा प्रवास

**पाऊस** सुरू झाला की निसर्गाचा चेहराच बदलतो. उन्हाने करपलेली धरती हिरवीगार होते. झाडांच्या फांद्यांवर नवी पालवी फुटते. नद्या वाहू लागतात. मातीचा सुगंध मनाला वेढून टाकतो. आकाशातून बरसणारा प्रत्येक थेंब जणू एकच संदेश देतो, जुने धुऊन काढा आणि नव्याला जागा द्या! बौद्ध परंपरेतील वर्षावास याच अर्थाने केवळ धार्मिक परंपरा नाही तर तो आत्मपरीक्षणाचा, संयमाचा, प्रबोधनाचा आणि सामाजिक जबाबदारीचा काळ आहे. भगवान बुद्धांच्या काळात पावसाळ्यात भिक्षूंनी एका ठिकाणी राहून साधना, अध्ययन, चिंतन आणि धम्मचर्चा करण्याची परंपरा विकसित झाली. या परंपरेच्या केंद्रस्थानी होती अहिंसा, करुणा, विवेक आणि आत्मशुद्धी. आज दोन हजार पाचशे वर्षांनंतर वर्षावासाकडे पाहताना त्याचा अर्थ आणखी व्यापक होतो. कारण बुद्धांचा धम्म आणि भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था यांच्यात एक मूलभूत सम ान धागा दिसतो, माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणे.

बुद्धांनी माणसाला जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठ मानण्यास नकार दिला. त्यांनी कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा विवेकाला आणि दैववादापेक्षा मानवी प्रयत्नांना महत्त्व दिले. संविधानानेही नागरिकाच्या जन्म, जात, धर्म, लिंग किंवा भाषेच्या आधारावर भेदभाव नाकारून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांना राष्ट्रजीवनाचा पाया दिला. म्हणूनच वर्षावास हा बुद्धांच्या धम्मातून संविधानाच्या मूल्यांकडे जाणारा एक वैचारिक पूल ठरू शकतो. वर्षावास म्हणजे स्वतःच्या मनाचा संविधान लिहिणे! संविधान देशासाठी कायदे आणि मूल्यांची चौकट निर्माण करते, पण समाजाचे खरे परिवर्तन केवळ कायद्याने होत नाही. कायद्यापेक्षा आधी माणसाच्या मनात बदल घडावा लागतो. संविधान म्हणते, सर्व नागरिक समान आहेत. पण आपल्या मनात अजूनही जातीय श्रेष्ठत्वाची भावना असेल तर समता कागदावरच राहते. संविधान स्वातंत्र्य देते, पण आपण दुसऱ्याच्या विचार स्वातंत्र्याचा आदर करीत नसू तर ते स्वातंत्र्य अपुरे ठरते. संविधान बंधुतेची भाषा करते, पण धर्म, जात आणि राजकीय मतभेदांच्या नावावर आपण एकमेकांचा द्वेष करत असू तर बंधुता कुठे उरते? म्हणूनच वर्षावासाचा काळ स्वतःला प्रश्न विचारण्याचा आहे, आपल्या मनात संविधान आहे का? हीच खरी परीक्षा आहे.

भारतीय समाजात जातिभेदाच्या भिंती अतिशय जुन्या आहेत. जन्माच्या आधारावर माणसाची किंमत ठरविण्याची व्यवस्था शतकानुशतके समाजात रुजली. अशा काळात बुद्धांनी माणसाच्या मूल्याचे मोजमाप त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या आचरणाने केले, हा विचार क्रांतिकारी होता. बुद्धांच्या संघात विविध सामाजिक स्तरांतील लोकांना स्थान मिळाले. स्त्रियांनाही संघात प्रवेश देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. त्यामुळे बुद्धांचा धम्म हा केवळ आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक समतेचा विचार होता. याच मूल्यांची आधुनिक अभिव्यक्ती भारतीय संविधानात दिसते. संविधानातील समतेचा अधिकार हा केवळ कायदेशीर कलम नाही. तो हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेविरुद्धचा आधुनिक प्रतिकार आहे. म्हणून वर्षावासात बुद्धांना स्मरण करणे म्हणजे केवळ बुद्धवंदना नव्हे, तर बुद्धांच्या समतेच्या विचाराला आपल्या आचरणात उतरवणे होय.

करुणा आणि बंधुता हे दोन शब्द असून एकच आत्मा आहे. बुद्धांच्या शिकवणीत करुणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुसऱ्याच्या दुःखाकडे पाहून मन हेलावणे आणि त्या दुःखाच्या निवारणासाठी कृती करणे म्हणजे करुणा. संविधानाच्या उद्देशिकेतील 'बंधुता' हीदेखील याच मानवी संवेदनशीलतेची आधुनिक सामाजिक अभिव्यक्ती आहे. आज मात्र आपण विचित्र काळातून जात आहोत. एका माणसाचे दुःख दुसऱ्यासाठी मनोरंजन बनते. सोशल मीडियावर अपमानाचे व्हिडिओ व्हायरल होतात. एखाद्या व्यक्तीच्या जात-धर्मावरून त्याच्या वेदनेचे मूल्य ठरविले जाते. गरीब, शेतकरी, कामगार, स्थलांतरित, बेरोजगार तरुण किंवा वंचित समाजघटक यांच्या प्रश्नांकडे अनेकदा केवळ आकडेवारी म्हणून पाहिले जाते. अशा वेळी बुद्धांची करुणा आणि संविधानाची बंधुता दोन्ही आपल्याला एकच प्रश्न विचारतात ङ्गतुला दुसऱ्याचे दुःख खरोखर जाणवते आहे का?ङ्ग जर उत्तर 'नाही' असेल, तर वर्षावास अजून संपलेला नाही.

बुद्धांनी कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका, असा विवेकवादी दृष्टिकोन दिला. विचार करा, तपासा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा, ही विचारपद्धती आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाशी जवळीक साधणारी आहे. भारतीय संविधान नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती विकसित करण्याचे कर्तव्य सांगते. इथे बुद्ध आणि संविधान पुन्हा एकाच दिशेने उभे दिसतात. आज सोशल मीडिया अफवांनी भरलेला आहे. खोटी माहिती क्षणात हजारो लोकांपर्यंत पोहोचते. धर्माच्या, जातीय अस्मितेच्या किंवा राजकीय भावनांच्या नावावर तथ्यांपेक्षा भावनांना महत्त्व दिले जाते. अशा काळात वर्षावास म्हणजे विचारांचा उपवास देखील असायला हवा अफवांपासून, द्वेषापासून, अंधानुकरणापासून आणि पूर्वग्रहांपासून.

वर्षावासाच्या काळात विहारांमध्ये प्रवचन, धम्मचर्चा आणि ध्यानधारणा होतात. ही परंपरा महत्त्वाची आहे. पण तिची खरी फलश्रुती विहाराच्या चार भिंतींच्या बाहेर दिसली पाहिजे. वर्षावासाच्या निमित्ताने एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तक मिळाले, एखाद्या व्यसनाधीन तरुणाला व्यसनमुक्तीचा मार्ग मिळाला, एखाद्या गरीब कुटुंबाला आधार मि ळाला, एखाद्या मुलीच्या शिक्षणासाठी मदत झाली, एखाद्या अन्यायग्रस्त व्यक्तीला न्यायासाठी साथ मिळाली, एखाद्या गावात संविधानाचे वाचन झाले, तर तो वर्षावास अधिक अर्थपूर्ण ठरेल. धम्म जर समाजाच्या अश्रूंपर्यंत पोहोचत नसेल, तर तो केवळ प्रवचनात अडकलेला धम्म आहे. बुद्धांनी दुःख ओळखले आणि त्याच्या कारणांचा शोध घेतला. संविधानानेही सामाजिक अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध न्यायाची चौकट निर्माण केली. म्हणून आजच्या वर्षावासात ध्यानाबरोबर संविधान वाचले पाहिजे. बुद्धवंदनेबरोबर समतेची शपथ घेतली पाहिजे धम्मचर्चेबरोबर सामाजिक प्रश्नांवर चर्चा केली पाहिजे आणि करुणेबरोबर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे.

आज धर्म हा अनेकदा माणसाला जोडण्याऐवजी विभाजित करण्यासाठी वापरला जातो. जातीय द्वेष, धार्मिक ध्रुवीकरण आणि असहिष्णुता वाढत असताना बुद्धांचा मध्यममार्ग अधिक महत्त्वाचा ठरतो. बुद्धांचा धम्म कोणावर विजय मिळविण्याची भाषा करत नाही; तो स्वतःच्या विकारांवर विजय मिळविण्याची भाषा करतो. आज आपल्याला इतर धर्मांशी लढण्यापेक्षा स्वतःच्या मनातील द्वेषाशी लढण्याची गरज आहे. दुसऱ्याच्या श्रद्धेचा अपमान करण्यापेक्षा स्वतःच्या अहंकाराचे परीक्षण करण्याची गरज आहे आणि संविधान बदलण्याची भाषा करण्यापेक्षा संविधानाच्या मूल्यांनुसार स्वतःला बदलण्याची गरज आहे. भारतीय संविधान हे केवळ शासन चालविण्याचे पुस्तक नाही. ते भारताने स्वतःला दिलेले नैतिक वचन आहे. न्याय प्रत्येकाला मिळावा, स्वातंत्र्य प्रत्येकाला अनुभवता यावे, समता प्रत्येकाला मिळावी आणि बंधुता प्रत्येकाच्या मनात रुजावी, ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात आणायची असतील तर बुद्धांचा विचार आपल्याला मोठी नैतिक ताकद देतो.

या वर्षावासात आपण किती प्रवचने ऐकली, किती कार्यक्रम केले, किती फुले वाहिली, किती बुद्धवंदना केल्या यापेक्षा एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे, तो म्हणजे आपल्या वागण्यात बुद्ध किती उतरले? आपल्या निर्णयात संविधान किती उतरले? आपल्या नात्यांत समता किती आली? आपल्या शब्दांत करुणा किती आली? आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य किती आले? जर या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची तयारी आपण केली, तर वर्षावास खऱ्या अर्थाने सुरू झाला असे समजावे. कारण वर्षावास हा पावसाळ्यातील मुक्काम नाही, तर तो मनुष्यत्वाच्या पुनर्जन्माची प्रक्रिया आहे. आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबासोबत आपण एक संकल्प करू या. द्वेष धुऊन काढू या, अंधश्रद्धेवर विवेकाची मशाल पेटवू या, जातिभेदाच्या भिंती पाडू या, करुणेने माणसाला माणसाशी जोडू या आणि बुद्धांच्या प्रज्ञेतून संविधानिक भारत घडवू या! कारण अखेरीस प्रश्न बुद्ध किती मोठे होते, हा नाही. प्रश्न हा आहे की, बुद्धांचा विचार आपल्याला किती मोठा माणूस बनवतो? आणि संविधान किती सुंदर आहे, हा देखील प्रश्न नाही. खरा प्रश्न असा आहे की, आपण संविधानातील मूल्यांनुसार किती सुंदर समाज घडवतो?याच आत्मपरीक्षणाचे नावःवर्षावास!

बुद्धांची प्रज्ञा आपल्याला विवेक देते, बुद्धांची करुणा आपल्याला माणूस बनवते, बुद्धांची समता आपल्याला भेदाभेदापलीकडे नेते आणि संविधानाची न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये त्या विचारांना आधुनिक लोकशाहीची चौकट देतात. म्हणूनच वर्षावासाचा खरा अर्थ एका वाक्यात सांगायचा झाला तर बाहेर पावसाची प्रतीक्षा आणि आत परिवर्तनाची तयारी. पाऊस मातीला भिजवतो, तर विचार मनाला भिजवतात. पाऊस नदीला प्रवाह देतो, तर करुणा माणुसकीला प्रवाह देते. पाऊस धरतीला हिरवाई देतो, तर समता समाजाला नवी पालवी देते आणि संविधान त्या हिरवाईला न्यायाची दिशा देते. बुद्धांची प्रज्ञा, करुणा आणि समता आपल्या जीवनात रुजो, संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये आपल्या आचरणातून अधिक बळकट होवोत, हीच सदिच्छा!सर्वांना वर्षावासाच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा!

**– प्रवीण बागडे, नागपूर**

# संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या सभेत क्रांतीकारकांच्या आठवणींना उजाळा

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – देशासाठी बलिदान दिलेल्या क्रांतीवीरांच्या कार्यकर्तुत्वाला येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या मासिक सभेत उजाळा देण्यात आला. क्रांती दिनानिमित्त रविवार दि. ९ रोजी सायंकाळी पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रोडवरील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात ही सभा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या भावना बुजोणे यांनी आपल्या भाषणात क्रांतीकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भावना बुजोणे, दिपक राव, विजय मोरवणे पूर्वा देशमुख यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊलीच्या प्रतिमेचे पूजन आणि



दिपप्रज्वलन करण्यात आले. क्रांती दिनाच्या औचित्याने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे ' जयोस्तुते श्री महंमगले ' हे गीत सामुहिक पद्धतीने तर हेमलता गोडबोले, शशिकांत कुलकर्णी, प्रकाश मोदी, भास्कर पाटील यांनी विविध गाणी सादर केली.

रिद्धिमा देशमुख हिने भगवदगीतेतील अध्याय म्हटला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशांक खांडेकर यांनी केले तर सुत्रसंचलनाची जबाबदारी स्नेहा चिंचवडकर यांनी सांभाळली. अध्यक्षीय समारोप विलास जोशी यांनी केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वैजापूरात बिरसा मुंडा यांच्या कार्याचे स्मरण-अभिवादन

वैजापूर, दि. १० (प्रतिनिधी) – जागतिक आदिवासी दिनानिमित्त वैजापूरात रविवार (ता,०९) रोजी सायंकाळी येवला रस्त्यावरील वीरभद्र मंदिरा जवळ देवी मंदिर परिसरातील मोठ्या संख्येने वास्तव्य असलेल्या आदिवासी महिला-पुरुष व युवक, लहान मुले,-मुली यांनी एकत्र येऊन बिरसा मुंडा व एकलव्य यांच्या प्रसतिमांचे पूजन, अभिवादन केले.

नगरसेवक तथा शिवसेना शहर प्रमुख पारस घाटे,माजी नगरसेवक शैलेश चव्हाण व सामाजिक कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिंह राजपूत, यांनी बिरसा मुंडा, एकलव्य यांच्या प्रतिमा समोर श्रीफळ सोडून, आरती केली.

अभिवादन केले.या समयी धोंडीराम राजपूत यांनी बिरसा



मुंडा यांच्या कार्याचे स्मरण उपस्थिताना करून दिले. या ठिकाणी आदिवासी संस्कृती, परंपरा व अस्मितेचा जागर झाला.पारंपरिक वेशभूषा, ढोल -ताशांचा गजर, आदिवासी नृत्य आणि विविध घोषणा देऊन आतषबाजी करण्यात आली. स्वस्तिक टॉकीज जवळ ही मोठी आदिवासी वस्ती आहे, येथेही स्टेज उभारून मुलं-मुली,तरुण ,व पुरुष-स्त्रिया यांनी पारंपरिक वेष भूषा व नृत्य, गीते सादर केली.या वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# जेष्ठ नागरिक व वाचक वर्गातर्फे शहीद व क्रांतिवीरांना वाचनालयात अभिवादन



वैजापूर, दि. १० (प्रतिनिधी) - १० ऑगस्ट या क्रांती दिनी येथील वैजीनाथ वाचनालयातील वाचक वर्ग व जेष्ठ नागरिकांनी रविवार(ता.०९)रोजी भारत मातेचे पूजन करून स्वातंत्र्यासाठी लढलेल्या शहीद व क्रांतिवीरांचे स्मरण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

आरंभी जेष्ठ वाचक व जेष्ठ नागरिक ईश्वर शिंपी जळगावकर, सेवा निवृत्त केंद्र प्रमुख उत्तमराव पारखे यांनी भारतमाता पूजन केले.त्या नंतर ग्रंथालय सहायक संजय राजपूत, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, गोरख साळुंके, मकरंद कुलकर्णी, पी.एन. क्षीरसागर, नितीन शिंदे, बबनराव करमासे, राधाकिसन सोनवणे,सेवा निवृत्त मंडल अधिकारी अशोक पवार खंडाळकर, बबनराव क्षीरसागर यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

धोंडीरामसिंह राजपूत यांनी नऊ ऑगस्ट क्रांती दिनाची व जागतिक आदिवासी दिनाबाबत माहिती दिली.शेवटी संजय राजपूत यांनी आभार मानले.

# क्रांती दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन







छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - क्रांती दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर संभाजी पेठ येथील महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना, मिल कॉर्नर येथील छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास तसेच टप्पा क्रमांक तीन येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमांनाही पुष्पहार अर्पण करण्यात आला.

त्यानंतर विश्वभारती कॉलनी येथील भारत माता मंदिरात भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, महिला व बालकल्याण समिती सभापती शोभा बुरांडे, प्रभाग समिती सभापती अनिता मानकापे, नगरसेवक चंद्रकांत हिवराळे, नगरसेविका कीर्ती शिंदे, अर्चना नीलकंठ, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील सर्व प्रभागांमध्येही अभिवादन - क्रांती दिनानिमित्त महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्येही संबंधित नगरसेवक तसेच महानगरपालिका अधिकारी यांच्या उपस्थितीत महापुरुषांच्या पुतळ्यांना व प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विविध ठिकाणी आयोजित या कार्यक्रमांद्वारे क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# वाढदिवसाच्या दिवशी केकऐवजी लिंबाचे रोपटे; पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश





**प्रेरणादायी उपक्रम**

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - वाढदिवस म्हटले की केक, चॉकलेट आणि भेटवस्तूंची रेलचेल असे चित्र नेहमी पाहायला मिळते. मात्र, घोडेगाव येथील संजय गोमलाडू यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त केक किंवा चॉकलेटऐवजी लिंबाचे रोपटे भेट देत पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला.

त्यांची मुलगी ऋतुजा संजय गोमलाडू हिच्या वाढदिवसानिमित्त हे रोपटे तिच्या हस्ते स्वीकारण्यात आले. त्यानंतर सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, घोडेगाव येथे सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत या रोपट्याची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे, या रोपट्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वतः गोमलाडू सरांनी घेतली आहे.

संजय गोमलाडू हे केवळ आपल्या मुलीच्या वाढदिवसापुरतेच वृक्षारोपण करत नाहीत, तर कुटुंबातील विविध शुभप्रसंगी वृक्षलागवडीचा उपक्रम राबवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आहेत. वटपौर्णिमा, वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस अशा विविध प्रसंगी त्यांनी शाळेच्या परिसरात वड, लिंब यांसह विविध वृक्षांची लागवड केली आहे. लागवडीनंतर या झाडांचे नियमित संगोपनही केले जात आहे.

झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण स्वच्छ व सुंदर ठेवा, हा संदेश गोमलाडू सर आपल्या विद्यार्थ्यांसह समाजाला देत असतात.

विशेष म्हणजे, केवळ उपदेश न करता पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वतःच्या घरापासून करण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. ऋतुजाच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेले हे लिंबाचे रोपटे तिच्यासाठी आयुष्यभराची सुंदर आठवण ठरणार आहे. त्याचबरोबर वाढदिवसाच्या निमित्ताने निसर्गाला दिलेली ही हिरवीगार भेट समाजासाठीही प्रेरणादायी ठरत आहे. केक कापण्याऐवजी झाड लावण्याचा हा उपक्रम 'वाढदिवस साजरा करण्याची नवी आणि पर्यावरणपूरक पद्धत' म्हणून निश्चितच कौतुकास्पद आहे.

# आरपीएफ नांदेडकडून प्रवासी सुरक्षा व गुन्हे प्रतिबंधासाठी प्रभावी कारवाया

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - रेल्वे प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे, गुन्हेगारीला आळा घालणे तसेच प्रवाशांना तातडीची मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), नांदेड विभागाने दिनांक ०३, ०५ व ०६ ऑगस्ट २०२६ रोजी विविध यशस्वी कारवाया करून पुन्हा एकदा आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे.

ऑपरेशन नार्कोस अंतर्गत आरपीएफच्या क्राइम इंटेलिजन्स ब्रांच (उखइ-ऊख), नांदेड व लोहमार्ग पोलीस (जीआरपी), नांदेड यांच्या संयुक्त पथकाने गाडी क्रमांक २०८०९ नागावली एक्सप्रेसमध्ये मुदखेड ते हजूर साहिब नांदेड स्थानकांदरम्यान विशेष अंमली पदार्थविरोधी तपासणी मोहीम राबवून दोन व्यक्तींना ताब्यात घेतले. पंच, राजपत्रित अधिकारी, विधी मापनशास्त्र विभागाचे अधिकारी तसेच न्यायवैद्यकीय (फॉरेन्सिक) पथकाच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या तपासणीत १०.७३६ किलोग्रॅम सुक्या गांजाची, अंदाजे रू ५.३७ लाख किंमतीची जप्ती करण्यात आली. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध अंमली पदार्थ व मनः प्रभावी पदार्थ अधिनियम (छउझड अलीं) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचे वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी ०६ ऑगस्ट २०२६ रोजी ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आरपीएफ उखइ-ऊख, नांदेड व एलसीबी/जीआरपी, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त पथकाने छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफफॉर्म क्रमांक १ वर विशेष गस्त घातली. गाडी क्रमांक १७६६२ नागरसोल-काचेगुडा एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान प्रवाशांचे खिसे कापण्याचा प्रयत्न करणे, आरडाओरडा करणे व प्रवाशांशी गैरवर्तन करणे अशा प्रकारे संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले. संबंधित व्यक्तीस पुढील कारवाईसाठी लोहमार्ग पोलीस (जीआरपी), छत्रपती संभाजीनगर यांच्या ताब्यात देण्यात आले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अंतर्गत छउठ क्रमांक ६७/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. याशिवाय ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफने दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये प्रवाशांचा हरवलेला ऐवज शोधून त्यांना परत करून आपल्या प्रवासी सेवेप्रती असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली.

पहिल्या घटनेत रेल मदत तक्रारीवर तातडीने कार्यवाही करत आरपीएफ पोस्ट नगरसूल यांनी गाडी क्रमांक १२७८७ एक्सप्रेसमध्ये प्रवाशाने विसरून ठेवलेली महाविद्यालयीन बॅग शोधून काढली. या बॅगेमध्ये रोख रक्कम, कपडे, इअरबड्स, मोबाईल चार्जर, एटीएम कार्ड, ओळखपत्रे तसेच इतर वैयक्तिक साहित्य असा एकूण रू ७,५०० किमतीचा ऐवज होता. आवश्यक पडताळणी पूर्ण केल्यानंतर हा ऐवज संबंधित प्रवाशाला सुरक्षितपणे परत करण्यात आला. प्रवाशाने आरपीएफच्या तत्पर व संवेदनशील सेवेसाठी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. दुसऱ्या घटनेत श्रीमती माधवी, या आपल्या पतीसमवेत गाडी क्रमांक १७०५८ नांदेड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेसने प्रवास करत असताना मनवत रोड रेल्वे स्थानकाजवळ त्यांचे सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र, अंदाजे रू १.४० लाख किंमतीचे, हरवले. ही माहिती मिळताच ट्रेन एस्कॉर्टिंग स्टाफने तातडीने संबंधित कर्मचाऱ्यांना कळिवले. त्यानंतर आरपीएफ व जीआरपीच्या कर्मचाऱ्यांनी तत्परतेने शोधमोहीम राबवून हरवलेले मंगळसूत्र शोधून काढले. आवश्यक पडताळणीनंतर ते संबंधित प्रवाशाला सुपूर्द करण्यात आले.

मौल्यवान ऐवज परत मिळाल्याने श्रीमती माधवी यांनी आरपीएफच्या तत्पर, समन्वित व प्रवासीहिताच्या कार्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. या सर्व यशस्वी कारवायांमधून रेल्वे सुरक्षा बलाची अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील कठोर भूमिका, गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण, रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सातत्यपूर्ण दक्षता तसेच हरवलेल्या मालमत्तेची योग्य मालकाला त्वरित परतफेड करण्याची बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# हाच संवाद मोहनजी भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांच्या दरम्यान साधला असता तर;कदाचित सरकारला जाग आली असती!

सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधला याचे स्वागत;हेच काम सरकारने वेळेच्या आधी विद्यार्थ्यांसोबत केले असते तर जेन-झीला एवढ्या जखमा झाल्या नसत्या. मोहन भागवतांनी जेन-झीवर विश्वास दाखविला ही चांगली गोष्ट आहे. परंतु प्रधानमंत्री यांना परिसीमन बिलाकरीता बहुमताच्या निमित्ताने पक्ष फोडून एनडीएमध्ये सहभागी झालेल्या खासदारांसोबत चर्चा करण्यास वेळ मिळाली; अशाप्रकारे जेन-झी सोबत वेळेच्या आधीच चर्चा करण्यास वेळ का मिळाली नाही?असे अनेक प्रश्न आज विद्यार्थ्यांसमोर उपस्थित होत आहेत. सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झीवर पूर्ण विश्वास करत ते म्हणतात की, विद्यार्थ्यांना चांगल्या व्येवस्थेसाठी आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि मी त्याचे समर्थन करतो असे जेन-झी सोबत संवाद साधताना त्यांनी म्हटले याचे मनापासून स्वागत.परंतु कोणताही राजकीय हेतू न बाळगता ज्या विद्यार्थ्यांनी सीजेपीच्या अंतर्गत आपल्या मागण्यांच्या संदर्भात आंदोलन दिनांक २० जूनला सुरू केले ते १९ जुलै पर्यंत शांततेत चालले या ३० दिवसांच्या कालावधीत सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा का केली नाही?या कालावधीत सरकार शांतपणे चर्चा करू शकले असते.परंतू सरकारने उपोषण कर्त्यांसोबत कोणतीही चर्चा न करता फक्त उघड्या डोळ्यांनी तमाशा पहाण्याचे काम केले आणि २० जुलै २०२६ ला जे व्हायचे नाही ते घडले व लोकशाही प्रणालीवर घणाघाती प्रहार करून लोकशाहीची वाट लावून लाठीचार्ज व बळाचा वापर सरकारने केला. विद्यार्थ्यांचे जंतरमंतरवर शांततेत तब्बल ३० दिवस आंदोलन चालले हे सरकारला किंवा मोहनजी भागवतांना त्यावेळी का दिसले नाही! असाही प्रश्न उपस्थित होतो.सरकारने आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत विद्यार्थ्यांसोबत चर्चा का केली नाही? आणि तोडगा का काढला नाही? असे अनेक प्रश्न आजही उपस्थित होत आहे. सोनम वांगचूक यांचे २५ दिवस उपोषण चालले व २६ व्या दिवशी विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर उपोषण सोडले.परंतु आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारने चर्चा केली असती तर कदाचित उपोषण करण्याची गरज भासली नसती व विद्यार्थ्यांना ३५ दिवस आंदोलन करावे लागले नसते व आंदोलनाला हिंसेचे गालबोट लागले नसते.परंतु सरकार तब्बल ३५ दिवस जंतरमंतरच्या आंदोलनाचा उघड्या डोळ्यांनी तमाशा पहात रहाली आणि या आंदोलनाला हिंसक वळण आले व अनेक विद्यार्थी व सुरक्षा कर्मचारी मोठ्या प्रमाणात गंभीर जखमी झाले याला जबाबदार कोण याचाही विचार सरकारने करायला हवा.सरकार परिसीमन बिल मंजूर करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत आहेत.या अनुषंगाने गुरूवार दिनांक ६ ऑगस्टला शिवसेना (उबाठा) पक्षातून शिवसेनेत आलेल्या सहा खासदारांसह तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडून 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया'या पक्षात गेलेल्या २० हून अधिक संसद सदस्यांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाश्त्याच्या निमित्ताने चर्चा केली.या बैठकीला एनडीएचे ४० हून अधिक खासदार उपस्थित होते.सोबतच अनेक मंत्री सुध्दा उपस्थित होते. या चर्चेदरम्यान पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांना आश्वस्त केले की, चिंता करू नका, मी तुमच्या पाठीशी आहे याचेही स्वागत!अशाच पध्दतीने सरकार किंवा पंतप्रधान किंवा इतर मंत्री यांनी जंतरमंतरवर जाऊन विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारच्या वतीने चर्चा केली असती आणि 'चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे'असे म्हटले असते तर कदाचित आंदोलन शांततेत पार पडले असते व सहज मार्ग निघाला असता.परंतु सरकारने किंवा सरकारमधील मंत्र्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्याला थोडेसेही महत्त्व दिले नाही व वर्चस्वाची लढाई समजून चर्चेसाठी टाळाटाळ केली आणि 'हम करे सो कायदा' अशी रणनीती दिसायला लागली.परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षांतील फुटुन आलेल्या खासदारांनसोबत वेळेतूनवेळ काढून नाश्त्याच्या निमित्ताने पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांसोबत चर्चा केली व त्यांना सांगितले की, 'चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे'.हेच वाक्य किंवा अशीच चर्चा माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) केली असती तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असता व लाठीचार्ज झालाच नसता.या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येते की, सरकारला सत्तेचे घमंड आले असावेत. परंतु सरकार आता म्हणते की,आम्ही विद्यार्थ्यांसोबत आहोत ही गोष्ट अगोदर झाली असती तर विद्यार्थ्यांच्या जखमेवर फुंकर घातल्या सारखे झाले असते. परंतु सरकारने प्रथम बळाचा वापर केला आणि आता आम्ही जेन-झी सोबत आहोत असे म्हणतात हे कितपत योग्य म्हणावे ही बाब देशाच्या १४५ कोटी जनतेला हळूहळू लक्षात येत आहे.माझ्यामते सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधण्यास खूप उशीर केला असावा. हाच संवाद भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांच्या काळात साधला असता तर कदाचित सरकारला जाग आली असती व विद्यार्थ्यांसोबत चर्चा करता आली असती. सरसंघचालक देशहिताचेच मुद्दे मांडतात यात दुमत नाही.परंतु सरकार त्यांच्या मुद्यांना कितपत मानतात हाही विचारांचा प्रश्न आहे. भागवत म्हणतात की, शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद केली पाहिजे आणि शिक्षण हा धंदा नाही.

ही बाब बरोबर आहे.परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात शिक्षण हा फक्त धंदा बनल्याचे दिसून येते.त्यामुळेच देशात पेपर फुटीसारखे गैरप्रकार दिसून येतात.कारण जोपर्यंत आमदार-खासदार,मंत्री, उच्चपदस्थ अधिकारी, राजकीय पुढारी आपल्या मुलामुलींना सरकारी शाळा-महाविद्यालये दाखल करीत नाहीत तोपर्यंत शिक्षण प्रणालीत सुधारणा शक्य नाही.जी कंगना राणावत 'जेन-झीला जनरेशन गटार आहे'म्हणाली होती ती आज जेन-झीला भारताची सर्वात मोठी ताकद व संस्कृतीची मोठी ओळख असल्याचे सांगत आहेत.म्हणजे पहिले गटार म्हणायचे आणि आता चांगले म्हणायचे ही कसली लोकप्रतिनिधी म्हणावी! कंगना राणावतने आता लोकप्रतिनिधी पदाचा त्याग केला पाहिजे व चित्रपटांमध्ये काम करायला पाहिजे.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
मो.नं.९९२१६९०७७९

# ३० वर्षांखालील नव्या फिल्ममेकर्सना मिळणार मोठं व्यासपीठ; एक्सेल एंटरटेनमेंटने सुरू केलं 'एक्सेल ओरिजिन्स'

एक्सेल एंटरटेनमेंटने आपल्या यशस्वी प्रवासाची २५ वर्षे पूर्ण केली आहेत. या खास टप्प्याच्या निमित्ताने रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी 'एक्सेल ओरिजिन्स' या नव्या उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा उद्देश ३० वर्षांखालील भारतीय फिल्ममेकर्सच्या नव्या पिढीचा शोध घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या सर्जनशील प्रवासात त्यांना पाठबळ देणे हा आहे.

रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी जेव्हा एक्सेल एंटरटेनमेंटची सुरुवात केली, तेव्हा दोघेही अवघे २६ वर्षांचे होते. त्यांचा पहिला चित्रपट दिल चाहता है हाही तरुण विचारसरणी आणि वेगळ्या प्रकारच्या कथा सांगण्याच्या इच्छेतून साकारला होता. पुढे हा चित्रपट संपूर्ण एका पिढीसाठी खास ठरला आणि एक्सेल एंटरटेनमेंटच्या त्या विचारसरणीची पायाभरणी झाली, ज्यामध्ये नव्या आवाजांना, ओरिजिनल कल्पनांना आणि सर्जनशील धाडसाला नेहमीच महत्त्व देण्यात आलं.

२५ वर्षांनंतर 'एक्सेल ओरिजिन्स'च्या माध्यमातून आता हीच संधी नव्या पिढीतील फिल्ममेकर्सना दिली जाणार आहे.

रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून 'एक्सेल ओरिजिन्स'च्या लॉन्चची घोषणा केली. उभरत्या कथाकारांचा शोध घेऊन त्यांना पाठबळ देण्याच्या दिशेने एक्सेल एंटरटेनमेंटच्या प्रवासातील हा एक नवा अध्याय आहे.

आपल्या संयुक्त निवेदनात दोघांनी म्हटलं, या उपक्रमाचा मुख्य फोकस ३० वर्षांखालील फिल्ममेकर्सवर असेल. याअंतर्गत स्वतःची वेगळी विचारसरणी आणि ओळख असलेल्या तरुण दिग्दर्शक आणि लेखकांचा शोध घेतला जाईल. त्यांच्या ओरिजिनल कल्पनांना प्रत्यक्षात साकारण्यासाठी त्यांना व्यासपीठ, आवश्यक संसाधने आणि सर्जनशील स्वातंत्र्य दिलं जाणार आहे.

'एक्सेल ओरिजिन्स' अशा कथांच्या शोधात असेल, ज्या पारंपरिक चौकटींना आव्हान देतील. यामध्ये विविध जॉनर, फॉरमॅट्स आणि सिनेमाच्या नव्या विश्वातील कथा समाविष्ट केल्या जातील. त्याचबरोबर नवोदित आणि उभरत्या कलाकारांसह इतर क्रिएटिव्ह टॅलेंटलाही संधी दिली जाणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश केवळ चित्रपटांची एक यादी तयार करणे हा नाही. त्याऐवजी नव्या फिल्ममेकर्स, कलाकार आणि लेखकांना पुढे आणण्यासोबतच ओरिजिनल आयपीज तयार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, जे एक्सेल एंटरटेनमेंटच्या पुढील अध्यायाचा महत्त्वाचा भाग ठरू शकतील.

अशा काळात, जेव्हा इंडस्ट्रीमध्ये आधीपासून प्रस्थापित टॅलेंट आणि आजमावलेल्या फॉर्म्युलांवर अधिक विश्वास ठेवला जात आहे, तेव्हा 'एक्सेल ओरिजिन्स' हा नव्या आवाजांवर विश्वास ठेवण्याचा आणि ते मोठे, प्रस्थापित नाव होण्यापूर्वीच त्यांना पुढे आणण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरत आहे.

एक्सेल एंटरटेनमेंट आपल्या पुढील २५ वर्षांच्या प्रवासाकडे वाटचाल करत असताना, हा उपक्रम कंपनीच्या सुरुवातीच्या विचारसरणीकडेच एक प्रकारे पुनरागमन आहेङ्कमोठ्या आणि वेगळ्या कल्पना घेऊन येणाऱ्या तरुणांवर विश्वास ठेवणे आणि त्यांच्या कल्पनांना वास्तवात साकारण्याची संधी देणे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कोळी महादेव, कोळी मल्हार जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी कोळी समाजबांधव रस्त्यावर

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रकरणांमध्ये कथित अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ बालाघाटातील अनुसूचित जमाती सेवा संघ, परभणी जिल्ह्याच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयासमोर सोमवारी शांततापूर्ण व सनदशीर पद्धतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. सिडको येथील राजीव गांधी स्टेडीयम येथे कोळी समाजबांधव मोठ्या संख्येने जमा झाले यामध्ये महीला व विद्यार्थ्यांचाही सहभाग होता. पोलिस बंदोबस्तात हा मोर्चा शांततेत जात पडताळणीसाठी कार्यालयावर धडकला. परंपरागत कपडे परिधान करून डफळी वाजवून हात फलके घेत आंदोलक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे मराठवाड्यातील कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्राची अनेक प्रकरणे प्रलंबित असून, या जमातींना घटनात्मक आरक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. या प्रश्नाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनात मराठवाड्यातील अंजिठा-बालाघाट डोंगररांगांतील कोळी महादेव व कोळी मल्हार समाजातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, युवक-युवती, विद्यार्थी आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

आंदोलकांनी १९५० पूर्वीच्या नोंदी, महसूल व जनगणना अभिलेख तसेच उपलब्ध जुन्या दस्तऐवजांचा योग्य पद्धतीने विचार करून जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी केली. तसेच पुणे, ठाणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांतील जुन्या नोंदींचा विचार करून समानतेच्या तत्त्वानुसार मराठवाड्यातील कोळी महादेव व कोळी मल्हार समाजाला न्याय देण्याची मागणी करण्यात आली.



समितीच्या कामकाजात पारदर्शकता यावी, सुनावणीची व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध करून द्यावी तसेच तपासणी समितीच्या अध्यक्ष व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संघाच्या प्रतिनिधींच्या अर्जांवर सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनादरम्यान संविधानाने दिलेल्या लोकशाही हक्कांचा वापर करून शासन व प्रशासनाचे लक्ष समाजाच्या प्रश्नांकडे वेधण्यात आले. आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण वातावरणात पार पडले.

संबंधित मागण्यांचे निवेदन शासन व प्रशासनाकडे सादर करण्यात आले. आंदोलकांनी प्रतिकात्मक टाळे ठोको आंदोलन केले.

कोळी महादेव, कोळी मल्हार समाजाच्या जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न तातडीने मार्गी लावून शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# दिव्यांग, तृतीयपंथीयांसह वंचित घटकांतील मतदारांसाठी विशेष मतदार नोंदणी मोहीम

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत दिव्यांग, तृतीयपंथीय, महिला सेक्स वर्कर्स, अनाथ, बेघर तसेच फुटपाथवर राहणाऱ्या पात्र नागरिकांचा मतदार यादीत समावेश करण्यासाठी जिल्ह्यात विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून २०२६ पासून मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर दावे व हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असून, मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील दिव्यांग, तृतीयपंथीय, महिला सेक्स वर्कर्स, अनाथ, बेघर अथवा फुटपाथवर राहणारे नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नयेत, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने विशेष नियोजन केले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना या घटकांतील पात्र नागरिकांच्या मतदार नोंदणीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या मोहिमेअंतर्गत शहरातील १०७-औरंगाबाद मध्य, १०८-औरंगाबाद पश्चिम आणि १०९-औरंगाबाद पूर्व या विधानसभा मतदारसंघांसाठी संयुक्तपणे जिल्हा समाज कल्याण कार्यालयात तृतीयपंथीय मतदार नोंदणीची विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला संबंधित नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या विशेष मोहिमेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा हक्क बजावता यावा आणि कोणताही पात्र मतदार मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक यंत्रणेकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मोहीम जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या आदेशाने तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

# विभागीय माहिती कार्यालयात सहाय्यक संचालकपदी सुरेश पाटील रुजू



छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (वर्ग-२, राजपत्रित) पदावर सुरेश पाटील रुजू झाले. उपसंचालक प्रवीण टाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

विद्यमान सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांची जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर पाटील यांनी फुंदे यांच्याकडून पदभार स्वीकारला.उपसंचालक प्रवीण टाके यांच्या मार्गदर्शनात ते काम करणार आहेत.

सहाय्यक संचालकपदी रुजू होण्यापूर्वी पाटील हे शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. या सेवाकाळात त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभारही सांभाळला.

सुरेश पाटील यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. दैनिक सकाळ, पुढारी आणि सायं दैनिक लोकमान्य सांजवर्ता या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी बातमीदारी केली आहे.याशिवाय प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते.

छत्रपती संभाजीनगर विभागातील वृत्त व माहितीसाठी त्यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ७०२८५८६९१९ वर संपर्क साधता येईल.

# स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी प्रशासनाची पूर्व तयारी

## विभागीय आयुक्त कार्यालय प्रांगणात पालकमंत्री करणार ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.



या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून परिपूर्ण तयारी करावी, असे निर्देश सहआयुक्त (साप्रवि) मंजुषा मिसकर यांनी दिले.

स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांच्यासह महसूल, गृह विभाग, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, माहिती विभाग आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# युनायटेड वेस्टर्न–आयडीबीआय निवृत्त सेवकांची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

नागपूर दि.९ (प्रतिनिधी)- युनायटेड वेस्टर्न बँक–आयडीबीआय बँक निवृत्त सेवक संस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथील सावरकर सभागृहात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

नितीन गडकरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभेचा शुभारंभ करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी यांनी नितीन गडकरी यांचे स्वागत केले तसेच उपस्थित मान्यवरांचे पण स्वागत केले. यावेळी त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची तसेच सभेच्या कामकाजाची माहिती देत, उपस्थित राहिल्याबद्दल नितीनजी गडकरी यांचे आभार मानले.

यावेळी मार्गदर्शन करताना नितीन गडकरी यांनी निवृत्तीनंतरच्या आर्थिक नियोजनाचे आणि सुरक्षित गुंतवणुकीचे महत्त्व अधोरेखित केल. रस्ते महामंडळाचे बॉण्डस् मध्ये गुंतवणूक केल्यास व्याजाचा चांगला परतावा मिळेल व त्याला AAA रेटिंग आहे हे आवर्जून सांगितले .भारतीय बँकिंग क्षेत्रातील सध्याच्या घडामोडींवरही त्यांनी प्रकाश टाकला. तसेच सहकारी बँकिंग संस्थांच्या कार्यपद्धतीसंदर्भात आणि निवृत्त सेवकांच्या संघटनात्मक कार्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. अनंत कुलकर्णी आणि सभासद इंदुरकर यांचा गडकरी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेच्या वतीने ७५ वर्षे पूर्ण केलेल्या २० सभासदांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.



अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात संस्थेच्या लेखा-हिशोबासह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लेखापरीक्षक (ऑडिटर) नियुक्तीचा प्रस्तावही सभेसमोर ठेवण्यात आला. त्यावर चर्चा झाल्यानंतर संबंधित प्रस्तावांना सभेने मंजुरी दिली.

सभेचे सुत्र संचालन व्ही. डी. कुलकर्णी यांनी केले. देशभरातील विविध भागांतून सुमारे ३५० प्रतिनिधी या सभेस उपस्थित होते. भारतीय मजदूर संघ तसेच NOBO, IDBIOOचे राष्ट्रीय व स्थानिक पदाधिकारी, कमिटी सदस्य, जनरल सेक्रेटरी चौधरी आणि उपाध्यक्ष अष्टेकर यांचीही यावेळी उपस्थिती होती.

सभेचे यशस्वी आयोजन आणि संस्थेच्या कार्याची माहिती देताना नागपूर रिजनल सेक्रेटरी श्रीकांत वनकर यांनी ही माहिती दिली.

# माहिती अधिकारीपदी संजीवनी जाधव-पाटील रूजू

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी या पदावर श्रीमती संजीवनी जाधव-पाटील नुकत्याच रूजू झाल्या.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने व अन्य कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. मूळच्या छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असणाऱ्या श्रीमती



जाधव यांनी या पूर्वी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे उपसंपादक, त्यानंतर विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन नवी मुंबई येथे सहायक संचालक म्हणून कार्य केले आहे.

श्रीमती जाधव-पाटील यांनी पत्रकारितेत बी.जे., एम.जे. तसेच एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. प्रशासनात येण्यापूर्वी दै. लोकपत्रमध्ये उपसंपादक म्हणून कार्य केले आहे. तसेच आकाशवाणी केंद्रात प्रादेशिक वृत्तनिवेदिका आणि एमसीएन (माध्यम) वृत्तवाहिनीमध्ये निवेदिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

## (पान १ वरुन)

### पेपरफुटीविरोधात आंदोलन,...

नागरी सेवा पूर्व परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच टीएसआर डेटा प्रोसेसिंग प्रायव्हेट लिमिटेड या विवादित वेंडर एजन्सीची चौकशी अंमलबजावणी संचालनालयाकडून करण्यास सहमती दर्शवली होती. मात्र, जेएसएससी सीजीएल परीक्षा रद्द करण्याची मागणी सरकारने अमान्य करत तिची केवळ न्यायिक चौकशी करण्याचे आश्वासन दिले.

शासकीय समितीने ९८ टक्के मागण्या मान्य केल्याचा दावा केला असला तरी, विद्यार्थ्यांनी हा दावा फेटाळून लावत सरकारवर आरोप केले. १३ पैकी केवळ ३ परीक्षा रद्द करण्यास सरकारने संमती दर्शविल्याने असंतोष वाढला असून १० ऑगस्टच्या विधानसभा मार्चसाठी विद्यार्थ्यांनी सर्वसामान्य जनता व राजकीय पक्षांचा पाठिंबा मागितला होता.

दरम्यान, जेपीएससीमध्ये एक मोठा प्रशासकीय बदलही झाला आहे. आयोगाचे तीन सदस्य अजिता भट्टाचार्य, जमील अहमद आणि अनिमा हंसदा यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिला आहे. तिन्ही सदस्यांनी राज्यपालांकडे आपले राजीनामे सादर केले असून, ते स्वीकारण्यात आले आहेत. यापूर्वी, २२ जुलै रोजी जेपीएससीचे अध्यक्ष एल. खियांगटे यांनीही राजीनामा दिला होता. सध्या, जेपीएससी भरती परीक्षांमधील अनियमिततेच्या आरोपांची सीआयडी चौकशी करत आहे. या संदर्भात आयोगाच्या सदस्यांची चौकशी केली जात आहे.

### बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्र...

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यात आली. या प्रक्रियेत अंबुरे यांच्याकडून प्रतिज्ञापत्र आणि शपथपत्रही घेण्यात आल्याचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर २४ जून रोजी मौजे खळवट लिमगावचा नमुना-३३ संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला. त्यामुळे संबंधित कागदपत्र ऑनलाइन उपलब्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या स्पष्टीकरणानुसार, सद्यस्थितीत रेखा अंबुरे यांची कोणतीही कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित नाहीत. यामुळे रेखा अंबुरे यांच्या कागदपत्रांबाबत प्रशासनाकडून कोणतीही प्रक्रिया रखडलेली असल्याचा दावा चुकीचा असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### शिवसेनेच्या ६ खासदारांच्या....

तात्काळ स्थगिती देण्यात यावी, अशी आग्रही मागणी ॲड. सिब्बल यांनी न्यायालयाकडे केली.

दुसरीकडे, शिवसेना शिंदे गटाची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी या याचिकेवर सविस्तर उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाकडे वेळ देण्याची विनंती केली. या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नरसिंहा यांनी एक अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. त्यानुसार, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची योग्य आणि पुरेशी संधी मिळाली होती का, हा या संपूर्ण प्रकरणातील कळीचा मुद्दा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आमची सत्ता येऊ द्या,....

झाले आहे. हा पक्ष कोणत्याही परिस्थितीत इंडिया ब्लॉकच्या विरोधात भूमिका घेणार नाही किंवा एनडीएला मदत करणार नाही. तसेच परिसीमन राष्ट्रहितासाठी योग्य नसून, शरद पवार किंवा सुप्रिया सुळे याला कधीही पाठिंबा देतील असे मला वाटत नाही.'' शिवसेना (ठाकरे गट) पंतप्रधानांची भेट का घेत नाही? या प्रश्नावर राऊत संतापले. ते म्हणाले, ''आम्ही त्यांना भेटायला जाणार नाही, ही आमच्या पक्षाची भूमिका आहे. त्यांनी आमचा नुसता पक्ष फोडला नाही, तर तो एका ऐऱ्यागैऱ्याच्या हातात दिला ज्यांचा शिवसेनेशी काहीही संबंध नाही. आमची सत्ता येऊ द्या, पक्ष कसे फुटतात हे आम्ही पण दाखवून देऊ. ज्या दिवशी यांची सत्ता जाईल, त्या दिवशी आपोआप ८० टक्के भाजप रिकामी होईल. सत्ता काय करू शकते, हे तेव्हा त्यांना कळेल. कोणतीही कृती न करता भाजपा एका माचीसच्या रिकाम्या बॉक्ससारखी होईल असे राऊत म्हणाले.

### तमिळ आमची जीवनवाहिनी;...

क्षेत्रातील उपक्रमांच्या कार्यक्रमांच्या सुरुवातीला हे राज्यगीत सर्वप्रथम गाणे अनिवार्य आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने जानेवारी महिन्यात शासकीय कार्यक्रमांमध्ये आधी राष्ट्रीय गीत आणि नंतर राष्ट्रगीत वाजवण्याचे निर्देश जारी केले होते. त्यानंतर जुलैमध्ये काढलेल्या एका सूचनेत सरकारने राज्यांना या निर्देशांचं कडक पालन करण्यास सांगितलं होतं. ९ जुलैच्या सूचनेत म्हटलं होतं की, ''जेव्हा जेव्हा राष्ट्रीय गीत/राष्ट्रगीतासोबत राज्यगीत गायलं किंवा वाजवलं जाईल, तेव्हा राष्ट्रीय गीत प्रथम गायले किंवा वाजवलं जाईल आणि त्यानंतर राष्ट्रगीत वाजवलं जाईल.''

### मराठा आरक्षणासाठी जिंतूर...

तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थांनी रुग्णालयात गर्दी केली होती. दरम्यान, बामणी पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात जाऊन प्राथमिक पंचनामा केला.

मृताच्या नातेवाइकांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश ठोंबरे हे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावरून नैराश्यात होते. याच कारणातून त्यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी बामणी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलिस हवालदार ठाकूर करीत आहेत. गणेश ठोंबरे यांचे चुलत भाऊ तथा पंचायत समिती सदस्य भास्करराव ठोंबरे यांनी सांगितले की, मागील दोन-तीन दिवसांपासून गणेश हे 'मराठा समाजाच्या आरक्षणाचा काहीच उपयोग होत नाही,' असे म्हणत होते असे सांगितले. गणेश यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शासनाने कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी तसेच आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भास्करराव ठोंबरे यांनी केली. आज सोमवारी (दि.१०) सकाळी गणेश ठोंबरे यांचा मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबीयांना स्वाधीन करण्यात आला.

### चार प्रमाणपत्र रद्द झाले तर...

जात पडताळणी समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न आहे. महसूलमंत्र्यांना मी गिनत नाही हे दाखवतायत, ही दहशतवादाची भाषा आहे. ओबीसी नेते यांना सांगण आहे की, आरक्षण संपलय आणि तुम्ही काही बोलायला तयार नाही. शासनकर्ते जमातच ओबीसी म्हणून निवडून आलेत मग मूळ ओबीसी कुठं आहेत? असा सवाल लक्ष्मण हाकेंनी उपस्थित केला. ओबीसीच्या जागा ह्या मराठा कुणबी यांनी घेतल्या आहेत, त्यामुळे ओबीसीचे आरक्षण संपलेले आहे. कुणबीचे ४ प्रमाणपत्र रद्द झाले आहेत तर जरांगे थयथय नाचतोय. मुख्यमंत्र्यांची आयमाय काढली जाते, तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री आहेत. महसूल मंत्र्यांच्या व्यंगावर बोलतायत. राज्यातील पुरोगामी कुठं गेलेत? हा वर्णभेद नाही का? असा सवाल हाकेंनी केला.

# घाटीत एकाच दिवशी दोन देहदान; वर्षभरात एकूण ३१ देहदान प्राप्त

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाला सोमवार, १० ऑक्टोबर रोजी एकाच दिवसात दोन देहदान प्राप्त झाले. यामुळे या वर्षातील एकूण देहदानांची संख्या ३१ वर पोहोचली आहे.

कै. आसाराम किसन साळुंके (७९, रा. दुनकी, ता. वैजापूर) आणि कै. इंदुबाई रावण पाटील (७९, रा. गणपूर, ता. चोपडा) यांच्या कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत देहदानाचा निर्णय घेतला. मातोश्री वृद्धाश्रम तसेच जगदगुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्या प्रेरणेतून ही दोन्ही देहदाने घडून आली. देहदान चळवळ व्यापक करण्यात सामाजिक संस्थांचा मोठा वाटा असल्याचे विभागाने नमूद केले.

विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, एखाद्या व्यक्तीने जिवंतपणी देहदानाचा अर्ज भरलेला नसला तरी, त्यांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांना देहदान करण्याची इच्छा असल्यास, नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून देहदान करता येते. देहदान पूर्ण झाल्यानंतर संबंधित कुटुंबीयांना देहदान प्रमाणपत्र व देहदान कार्ड देण्यात येते. यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाच्या स्वाक्षरीचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक आहे. शरीररचनाशास्त्र विभागामध्ये सध्या महिला अधिकाऱ्यांचा पूर्ण स्टाफ असून, त्या देहदानाशी संबंधित संवेदनशील व प्रशासकीय जबाबदाऱ्या अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडत आहेत. गरजू नागरिकांना आवश्यक मदत करण्यासाठी विभागातील कर्मचारी सदैव तत्पर असतात.

ही संपूर्ण प्रक्रिया घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. आजची दोन्ही देहदाने पूर्णत्वास नेण्यासाठी सहायक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले, तर सहयोगी प्राध्यापक डॉ. हिजाब अख्तर यांनी सहकार्य केले. पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मिर्झा, विशाल आणि योगेश यांनी परिश्रम घेतले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer EHV (O&M) Division Chhatrapati Sambhaji Nagar on behalf of MSETCL (The Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco SRM E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/irj/portal** for following works.

| Sr.No. | Particular of works | Tender No. |
|---|---|---|
| 01 | Work of AMC for work for Attending emergency, Breakdown and Maintenance works of 220kV and 132kV Lines under EHV (O&M) Divison, Chhatrapati Sambhaji Nagar | Rfx No. 7000041084 |

For further details visit our website
**https://srmetender.mahatransco.in/irj/portal**
**Contact Person:** Dy. Executive Engineer (O) 8554995049
The Undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

Sd/-
**Executive Engineer, EHV (O&M) Divison, MSETCL, Chhatrapati Sambhaji Nagar**